CMYK

मुख्यमंत्र्यांनी दावोसमधून अनुभवला भारतातील पहिल्या आंतरराष्ट्रीय सायकलिंग 'ग्रँड टूर'चा थरार >> पान 2

दावोसमध्ये पहिल्याच दिवशी १४ लाख ५० हजार कोटींचे सामंजस्य करार >> पान 3

हक्काच्या लाभासाठी लाडक्या बहिणींचा आक्रोश >> पान 4

**सुविचार**

सद्गुणांसाठी दुसऱ्याकडे बघा व दुर्गुणांसाठी स्वत:वर नजर ठेवा.– अज्ञात


# दैनिक आपला विदर्भ

apalavidarbhlivenews@gmail.com मुख्य संपादक : देविदास खनपटे मो. 9767233034

■ बुलढाणा ■ वाशिम ■ यवतमाळ ■ अमरावती ■ वर्धा ■ नागपूर ■ गोंदिया ■ भंडारा ■ चंद्रपूर ■ गडचिरोली ■ छत्रपती संभाजीनगर ■ मुंबई

■ दैनिक ■ बुलडाणा ■ वर्ष 04 ■ अंक 164 ■ बुधवार, दि. 21 जानेवारी 2026 ■ पाने 4 ■ किंमत रु. 2 ■ RNI.NO.MAHMAR/2023/88006




नेहा कक्करनं घटस्फोटाच्या अफवांवर लावला पूर्णविराम, दिलं सोशल मीडियाद्वारे स्पष्टीकरण... आतील पान

# शहीदी समागम कार्यक्रम जागतिक स्तरावर नेण्यासाठी समन्वयाने काम करा : राज्यमंत्री माधुरी मिसाळ

## 'हिंद दी चादर' श्री गुरु तेग बहादूर साहिबजी ३५० व्या शहीदी समागम कार्यक्रमाची आढावा बैठक संपन्न

दैनिक आपला विदर्भ



**नांदेड/प्रतिनिधी :** 'हिंद दी चादर' श्री गुरु तेग बहादूर साहिबजी यांच्या ३५० व्या शहीदी समागमाचा कार्यक्रम नांदेडपुरता मर्यादित न राहता जागतिक स्तरावर पोहोचावा, यासाठी सर्व यंत्रणांनी समन्वयाने, काटेकोर नियोजनासह जबाबदारीने काम करावे, असे स्पष्ट निर्देश नगरविकास, परिवहन, सामाजिक न्याय, वैद्यकीय शिक्षण, अल्पसंख्याक विकास व औकाफ राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांनी दिले.

नांदेड येथे होणाऱ्या या शताब्दी वर्ष कार्यक्रमाच्या आयोजनाचा राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांनी दूरदृष्य प्रणालीद्वारे (व्हिडिओ कॉन्फरन्स) सविस्तर आढावा घेतला. या बैठकीत संबंधित जिल्ह्यांचे जिल्हाधिकारी, राज्यस्तरीय समितीचे समन्वयक रामेश्वर नाईक, समिती अध्यक्ष डॉ. विजय सतबीर सिंग, विभागीय माहिती उपसंचालक, जिल्हा माहिती अधिकारी तसेच विविध विभागांचे वरिष्ठ अधिकारी सहभागी झाले होते.

राज्यमंत्री मिसाळ म्हणाल्या की, कार्यक्रमस्थळी पुरेसे पिण्याचे पाणी, स्वच्छ व पर्याप्त शौचालय व्यवस्था सुनिश्चित करण्यात यावी. कार्यक्रमाची प्रचारप्रसिद्धी व्यापक प्रमाणात करण्यात यावी. स्थानिक स्तरावर होणाऱ्या उपक्रमांमध्ये लोकप्रतिनिधींचा सक्रिय सहभाग आवश्यक असून सोशल मीडिया, इलेक्ट्रॉनिक मीडिया व मुद्रित माध्यमांच्या माध्यमातून व्यापक जनजागृती केली जावी, असेही त्यांनी निर्देश दिले.




विद्यार्थ्यांमध्ये राष्ट्रभक्ती व प्रेरणा निर्माण व्हावी, यासाठी शाळा स्तरावर निबंध व वक्तृत्व स्पर्धांचे आयोजन करून त्याची माहिती पोर्टलवर अपलोड करावी. तसेच सिनेमागृहांमध्ये भक्तिगीत प्रसारित करणे, प्रत्येक जिल्ह्यात होर्डिंग्ज लावून कार्यक्रमाचा संदेश पोहोचवणे आवश्यक असल्याचेही त्यांनी सांगितले. मुख्य कार्यक्रमास महिला, ज्येष्ठ नागरिक व दिव्यांग व्यक्तींना सहज सहभागी होता यावे, यासाठी पार्किंग क्षेत्रापासून कार्यक्रमस्थळापर्यंत योग्य वाहतूक व्यवस्था उपलब्ध करून देण्याचे निर्देशही राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांनी दिले.

## गोविंद पानसरे हत्याकांडातील संशयित आरोपी समीर गायकवाड याचा मृत्यू

दैनिक आपला विदर्भ



**कोल्हापूर/प्रतिनिधी :** कॉम्रेड गोविंद पानसरे हत्याकांडा प्रकरणातील संशयित आरोपी समीर गायकवाड याचा आज सकाळी सांगलीत मृत्यू झाला. माहितीप्रमाणे, डॉक्टरांनी त्याचा मृत्यू हृदयविकाराच्या झटक्यामुळे झाला असल्याचे सांगण्यात आले आहे. समीर गायकवाडची रात्रीच्या सुमारास अचानक तब्येत बिघडल्याने त्याला सांगलीतील सिव्हिल हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले होते. डॉक्टरांनी सकाळी त्याचा मृत्यू झाल्याची घोषणा केली. शवविच्छेदनानंतर मृत्यूचे नेमके कारण स्पष्ट होणार आहे.

समीर गायकवाड हा सनातन संस्थेचा साधक असून गोविंद पानसरे हत्याकांडातील प्रमुख संशयित होता. १६ फेब्रुवारी २०१५ रोजी कोल्हापूर येथे गोविंद पानसरे यांची हत्या झाली होती. पानसरे यांच्यावर जवळून गोळी झाडण्यात आली होती आणि उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाला. पानसरे हे प्रगतीशील विचारांचे समर्थक आणि सामाजिक वतुर्ळात प्रभावशाली व्यक्ती होते. गायकवाडाला २०१५ मध्ये अटक करण्यात आली होती आणि तो चार वर्षांपूर्वी जामीनावर बाहेर आला होता. तेव्हापासून तो सांगलीतील विकास चौक परिसरातील आपल्या घरात राहात होता. या प्रकरणातील महत्त्वाचा दुवा मानला जाणारा गायकवाड मृत्यूनंतर तपास यंत्रणांसमोर या प्रकरणातील इतर आरोपी समोर आणण्याचे मोठे आव्हान उभे राहिले आहे. समीर गायकवाडच्या मृत्यूनंतर त्याच्या कुटुंबावर शोककळा पसरली आहे. न्यायालयात हत्याकांडाचे खटले सुरु आहेत, परंतु गायकवाडच्या निधनामुळे प्रकरणाच्या पुढील तपासावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. प्रशासन आणि पोलिस तपास यंत्रणा या घटनेची नोंद घेत, प्रकरणातील इतर आरोपींचा शोध घेण्याच्या दृष्टीने काम करत आहेत.

# नितीन नबीन भाजपाचे नवे राष्ट्रीय अध्यक्ष

## पंतप्रधान मोदींनी दिल्या शुभेच्छा

नवी दिल्ली : भारतीय जनता पक्षाचे नेते नितीन नबीन यांनी मंगळवारी भाजपाचे नवे राष्ट्रीय अध्यक्ष म्हणून पदभार स्वीकारणार आहेत. सत्ताधारी पक्षाच्या संघटनात्मक नेतृत्वासाठी हा एक महत्त्वाचा क्षण आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यासह पक्षाचे अनेक वरिष्ठ नेते शपथविधी सोहळ्याला उपस्थित राहतील. भाजपाचे मुख्यमंत्री, राष्ट्रीय पदाधिकारी, प्रदेशाध्यक्ष आणि पक्षाच्या राष्ट्रीय कार्यकारी समितीचे सदस्य या कार्यक्रमाला उपस्थित राहण्याची अपेक्षा आहे.

नबीन यांची बिनविरोध निवड होण्याचा मार्ग मोकळा : सोमवारी झालेल्या नामांकनानंतर भाजपाने नितीन नबीन यांना राष्ट्रीय अध्यक्षपदासाठी एकमेव उमेदवार म्हणून घोषित केले, ज्यामुळे भाजपाचे १२ वे राष्ट्रीय अध्यक्ष म्हणून त्यांची बिनविरोध निवड होण्याचा मार्ग मोकळा झालाय. १४ डिसेंबर २०२५ रोजी नियुक्ती झालेल्या ४५ वर्षीय नबीन यांना पंतप्रधान नरेंद्र मोदी, गृहमंत्री अमित शाह आणि पक्षाचे मावळते अध्यक्ष जे.पी. नड्डा यांच्यासह भाजपाच्या उच्च नेतृत्वाचा जोरदार पाठिंबा मिळालाय.

मी भाजपाचा कार्यकर्ता– मोदी : मंगळवारी भाजपा मुख्यालयात याची घोषणा करण्यात आली. यावेळी पंतप्रधान मोदींनी त्यांचे पुष्पहार घालून स्वागत केलंय. मोदी म्हणाले की, ''भाजपा हा असा पक्ष आहे जिथे लोकांना वाटेल की मोदीजी इतक्या लहान वयात मुख्यमंत्री झाले. ते सरकारचे प्रमुख झालेत. या सर्वांमध्ये सर्वात मोठी गोष्ट म्हणजे मी भाजपाचा कार्यकर्ता आहे. पण मला वाटते की, नितीनजी माझे साहेब आहेत, मी एक कार्यकर्ता आहे.''



यापूर्वी नवीन यांनी दिल्लीतील भगवान वाल्मिकी मंदिर, गुरुद्वारा बांगला साहिब आणि झंडेवालन मंदिरात भेट दिली आणि पूजा केली. सोमवारी भाजपा मुख्यालयात अध्यक्षपदासाठी निवडणूक झाली. इतर कोणत्याही उमेदवाराने अर्ज दाखल न केल्याने नवीन यांची बिनविरोध निवड झाली. १४ डिसेंबर २०२५ रोजी नितीन नबीन यांना पक्षाचे कार्यवाहक अध्यक्ष बनवण्यात आलंय.

अध्यक्ष बदलतात, पण आदर्श बदलत नाहीत– मोदी : पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणाले की, देशातील राजकीय टीकाकारांनी जगाला हे सांगावे की भारत हा असा देश आहे, जिथे लोकशाही मजबूतपणे वाहते. जिथे जगातील सर्वात मोठा राजकीय पक्ष आहे. भाजपा ही एक संस्कृती आहे, ते एक कुटुंब आहे. येथे सदस्यत्वापेक्षा नातेसंबंध अधिक महत्त्वाचे आहेत. भाजपा एका प्रक्रियेवर चालते. येथे पद ही एक व्यवस्था आहे आणि पद ही आजीवन जबाबदारी आहे. अध्यक्ष बदलतात, पण आदर्श बदलत नाहीत. नेतृत्व बदलते, पण दिशा बदलत नाही. भाजपाचे स्वरूप राष्ट्रीय आहे. आत्मा राष्ट्रीय आहे, कारण आपले कनेक्शन स्थानिक आहे. आपली मुळे जमिनीखाली खोलवर रुजलेली आहेत.

## गुरु तेग बहादूर साहिबजींच्या ३५० व्या शहादत सोहळ्यासाठी केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांना निमंत्रण



दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी :** श्री गुरु तेग बहादुर साहिबजी यांच्या ३५० व्या शहिदी समागम वर्षानिमित्त ''हिंद दी चादर'' हा भव्य व ऐतिहासिक कार्यक्रम २४ आणि २५ जानेवारी २०२६ रोजी नांदेड येथे आयोजित केला आहे. या सोहळ्याचे निमंत्रण केंद्रीय गृह तथा सहकार मंत्री अमित शाह यांना राज्यस्तरीय समागम समिती सदस्य यांनी प्रत्यक्ष भेटीदरम्यान दिले.

नवी दिल्ली येथे राज्यस्तरीय समागम समितीच्या (महाराष्ट्र राज्य) पदाधिकाऱ्यांनी केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांची सदिच्छा भेट घेऊन निमंत्रण दिले. केंद्रीय गृहमंत्री शाह यांनी २५ जानेवारी रोजी आयोजित कार्यक्रमास उपस्थित राहण्याचे निमंत्रण स्वीकारले. यावेळी पोहरादेवीचे महंत बाबुसिंग महाराज (सहअध्यक्ष), समन्वय समितीचे अध्यक्ष रामसिंग महाराज, नांदेड येथील गुरुद्वारा प्रशासक डॉ. विजय सतबीर सिंग, समन्वयक श्री. रामेश्वर नाईक, सहसमन्वयक जसपाल सिंग, सदस्य चरणदीप सिंग (हॅप्पीसिंग), सतिश निहलानी आणि सहनिमंत्रक तेजासिंग बावरी आदी उपस्थित होते.

नांदेड येथील मोदी मैदान येथे आयोजित या सोहळ्याला केंद्रीय गृहमंत्री अमित शाह हे २५ जानेवारीला दुपारी २ ते ५ या वेळेत उपस्थित राहणार आहेत. तसेच, पं. धीरेंद्र कृष्ण शास्त्री (बागेश्वर धाम सरकार) उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी देखील निमंत्रण स्वीकारले असून ते २४ जानेवारीला या सोहळ्याला उपस्थित राहतील, अशी माहिती समितीच्या वतीने देण्यात आली.

## श्री गुरु तेग बहादूर साहिबजी यांच्या ३५० व्या शहीदी समागम कार्यक्रमात पंचक्रोशीतील गावांचा सहभाग वाढविण्यासाठी निवासी उपजिल्हाधिकाऱ्यांचा पुढाकार

**नांदेड/प्रतिनिधी :** शिख पंथाचे नववे गुरु श्री गुरु तेग बहादूर साहिबजी यांच्या ३५० व्या शहीदी समागम कार्यक्रमानिमित्त नांदेड शहर व पंचक्रोशीतील गावकऱ्यांचा मोठ्या प्रमाणावर सहभाग मिळावा, यासाठी निवासी उपजिल्हाधिकारी किरण अंबेकर यांनी आज लंगर साहिब गुरुद्वारा येथे भेट देऊन बाबा बलवंदरसिंगजी यांच्याशी चर्चा केली.यावेळी बाबा बलवंदरसिंग यांनी नांदेड शहरासह पंचक्रोशीतील सर्व नागरिकांना आवाहन केले की, शनिवार २४ जानेवारी २०२६ रोजी सकाळी ८ वाजता तख्त सचखंड श्री हुजूर साहिब गुरुद्वारा येथून निघणाऱ्या भव्य नगर किर्तनात नागरिकांनी, महिला, युवक व बालगोपालांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे.तसेच प्रत्येक गावातून किमान एक दिंडी भजन मंडळासह नगर किर्तनात सहभागी होण्याचे आवाहनही त्यांनी केले. श्री गुरु तेग बहादूर साहिबजी यांनी धर्म, मानवी हक्क व समाजहितासाठी दिलेल्या बलिदानाचा गौरवशाली इतिहास समाजापर्यंत पोहोचावा, यासाठी जनसहभाग अत्यंत महत्त्वाचा असल्याचे त्यांनी नमूद केले.




# 'हिंद-दी-चादर' कार्यक्रमासाठी नांदेड सज्ज !

## १० लाख भाविकांची मांदियाळी – विभागीय आयुक्त जितेंद्र पापळकर

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी :** नांदेड नगरी एका ऐतिहासिक सोहळ्यासाठी सज्ज होत आहे. शीख धर्माचे नववे गुरु श्री गुरु तेग बहादूर साहिब जी यांचा ३५० वा शहीदी समागम हा भव्य कार्यक्रम येत्या २४ आणि २५ तारखेला पार पडणार आहे. त्यासाठी प्रशासनाने जय्यत तयारी केली आहे. देश–विदेशातून सुमारे १० लाख भाविक या सोहळ्यासाठी नांदेडमध्ये दाखल होण्याची शक्यता असल्याचे विभागीय आयुक्त जितेंद्र पापळकर यांनी सांगितले.

सूक्ष्म नियोजन आणि विविध समित्या

कार्यक्रमाच्या दृष्टीने प्रशासनाने सूक्ष्म नियोजन केले आहे. भाविकांच्या सोयीसाठी विविध समित्या स्थापन केल्या आहेत. यात बुटांच्या व्यवस्थेपासून ते भोजनापर्यंतच्या जबाबदाऱ्या वाटून देण्यात आल्या आहेत. भाविकांसाठी ८ ठिकाणी अखंड लंगर (महाप्रसाद) सुरू राहतील. तसेच, त्यांच्या निवासाचीही उत्तम व्यवस्था करण्यात आली आहे. कार्यक्रम ठिकाणी आरोग्य शिबिरे उभारण्यात आली आहेत. यासोबतच शासकीय योजनांचे आणि विविध उद्योजकांचे स्टॉल्सही उपलब्ध असतील.

या सोहळ्याला अनेक मान्यवर उपस्थित राहणार आहेत. केंद्रीय गृहमंत्री अमित शाह, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि इतर राज्यांचे मुख्यमंत्रीही नांदेडमध्ये येतील. त्यामुळे सुरक्षिततेच्या दृष्टीनेही कडेकोट तयारी करण्यात आली आहे. महाराष्ट्र शासनाचा अल्पसंख्याक विभाग या कार्यक्रमासाठी नोडल एजन्सी म्हणून काम पाहत आहे.

हा कार्यक्रम एका समाजापुरता मर्यादित नाही. यात लबाना, बंजारा,सिकलीगर, बंजारा, लबाना, सिंधी, मोहयाल आदींसह आणि इतर सर्व समुदायांचे लोक मोठ्याप्रमाणात सहभागी होत आहेत.

जनतेचे योगदान महत्त्वाचे

आजच्या धावपळीच्या जगात त्याग आणि सेवा हीच खरी माणुसकी आहे. हा विचार जपण्याची ही सुवर्णसंधी आहे. त्यामुळे मराठवाडा आणि महाराष्ट्रातील जनतेसह देशभरातील जनतेने या ऐतिहासिक सोहळ्याला उपस्थित राहावे, असे आवाहन विभागीय आयुक्त जितेंद्र पापळकर यांनी केले आहे. ज्यांना या महायज्ञात सेवा (स्वयंसेवक म्हणून) द्यायची आहे, त्यांनी नांदेड जिल्हाधिकारी कार्यालयाशी संपर्क साधावा, असेही त्यांनी नमूद केले.



CMYK

## सहकार क्षेत्रातील बदल स्वागतार्ह

भारतात गेल्या शतकांपासून सहकारी संस्थांच्या चेहऱ्यात प्रचंड बदल झाले आहेत. सेवा संस्था, बहुउद्देशीय सहकारी संस्था, पतसंस्था, गैर-पतसंस्था, उत्पादन संस्था, वितरण संस्था, विपणन संस्था, प्रक्रिया संस्था यासारख्या क्रियाकलापांच्या दृष्टीने अनेक बदल नोंदवले गेलेत. आता केंद्र सरकार पुन्हा एकदा क्लस्टर मॉडेलवर आधारित सर्व क्रियाकलाप सहकारी संस्थांमध्ये एकत्रित समाविष्ट करण्याचा प्रयत्न करीत आहे. सहकारी क्लस्टर मॉडेल हा एक संकरित दृष्टिकोन आहे, जो सहकारी संघटनेचे फायदे आणि भौगोलिकदृष्ट्या केंद्रित उत्पादन क्लस्टरच्या कार्यक्षमतेला एकत्र करतो. कृषी संदर्भात, यामध्ये विशिष्ट भौगोलिक क्षेत्रातील (क्लस्टर) शेतकरी विशिष्ट पीक घेतात आणि सामूहिक सौदेबाजीची शक्ती मिळविण्यासाठी, प्रक्रिया आणि साठवण सुविधांसारखी संसाधने सामायिक करण्यासाठी आणि मोठ्या प्रमाणात अर्थव्यवस्था साध्य करण्यासाठी सामूहिक कृतीसाठी एकत्र येतात. सहकारी क्लस्टर म्हणजे भौगोलिकदृष्ट्या परिभाषित उत्पादन क्षेत्र रचना उत्पादक आणि सेवांना एकत्रित करून मोठ्या प्रमाणात स्थानिक अर्थव्यवस्था निर्माण करते. अनेक शेतकरी उत्पादक संघटना आणि सहकारी संस्था असूनही त्यांच्याकडे भांडवल, व्यवस्थापकीय कौशल्ये आणि मजबूत विपणन नेटवर्कचा अभाव आहे. सरकारी योजना स्वतंत्रपणे काम करतात, ज्यामुळे समन्वय वाया जातो, मूल्य साखळीची लंबाई, अकार्यक्षम आणि कमी प्रक्रिया क्षमता निर्माण होतात. हवामान बदलाच्या धक्क्यांचा सर्वात जास्त फटका लहान शेतकऱ्यांना बसतो. भारताला एकात्मिक, व्यवसाय-केंद्रित ग्रामीण मॉडेलची आवश्यकता आहे. भारतातील ८५ टक्केपेक्षा जास्त शेतकरी लहान आणि सीमांत आहेत, ज्यांना कमी जमीन मालकी, उच्चत्तम इनपुट खर्च, कमकुवत बाजारपेठ, विखंडित मूल्य साखळी आणि हवामान असुरक्षितता यासारख्या आव्हानांचा सामना करावा लागत आहे. विद्रद्यमान सहकारी संस्था, शेतकरी उत्पादक संघटना, उपजीविका मोहिमा मर्यादित प्रमाणात गुपचूप आणि थंड राहतात. एक मजबूत मार्ग म्हणजे क्लस्टर-आधारित सहकारी मॉडेल, जे स्थानिक पातळीवर उत्पादन, प्रक्रिया, बाजारपेठ आणि जोखीम-वाटप एकत्रित करते. भारत २०४७ पर्यंत विकसित भारताचे एक धोरणात्मक मार्ग आखत असताना, वास्तविक आर्थिक परिवर्तन केवळ कॉर्पोरेट बोर्डरूममधूनच होणार नाही, तर २९.२ कोटी सक्रिय सदस्य आधार असलेल्या ८.५ लाख सहकारी संस्थांच्या सामूहिक ताकदीतून होईल. लोकशाही मालकीमध्ये रुजलेल्या या सहकारी संस्था स्थानिक कौशल्य आणि सामूहिक इच्छाशक्तीच्या सक्रिय परस्परसंवादाद्वारे उत्पादनाचे समृद्धीत रुपांतर करण्याची प्रचंड क्षमता अनुभवतात आणि व्यक्त करतात. शेती बहुआयामी व्यवसाय आहे. त्यासाठी अनेक इनपुटची आवश्यकता असते, जरी उत्पादन एकच असले तरी. त्यासाठी प्रक्रिया, ग्रेडिंग, मार्केटिंग, पॅकिंग अशा विविध सेवांची देखील आवश्यकता असते. पण, गरिबी, लहान शेती क्षेत्राकडे दुर्लक्ष आणि त्यांच्या उत्पादनांच्या विक्रीचे अपुरे ज्ञान यासारख्या अडचणींमुळे शेतकरी प्रत्येक कामात अडकलेले आहेत. त्यांच्या फायद्यांसाठी सामूहिक कृतीची आवश्यकता आहे, एकासाठी सर्व आणि सर्वांसाठी एक या दृष्टिकोनातून परस्पर समज आणि सामूहिक कृती आवश्यक आहे. सहकारी संस्थाच या समस्या सोडवू शकतात. म्हणूनच शेतीमध्ये हे क्लस्टर मॉडेल अतिशय उत्तम प्रकारे काम करू शकते. यापूर्वी विविध प्रयत्न केले गेले असले तरी त्याची आवश्यकता पुन्हा एकदा निर्माण झाली आहे. खुल्या अर्थव्यवस्थेच्या मॉडेलपासून सहकारी विचारसरणीने त्याची स्थिती आणि ग्लॅमर कमकुवत केले आहे. आता केंद्र सरकारला नवीन क्षितिजासह त्याचे पुनरुज्जीवन करायचे आहे. कृषी उत्पादनांसाठी आवश्यक असलेल्या उत्पादनांवर प्रक्रिया केली जाते, त्याचबरोबर नुकसान कमी करण्यासाठी, योग्य तपासणी करण्यासाठी आणि साठवणूक आणि विपणनासाठी प्रयत्न केले जातात. शेतकऱ्यांनी एकत्रितपणे इनपुटसाठी सौदेबाजी करण्याची त्यांची शक्ती मजबूत करणे आणि त्यांच्या सामूहिक उत्पादनांची अधिक प्रभावीपणे विक्री करणे सोपे होते. हे मॉडेल उत्पादक आणि प्रक्रिया करणारे आणि अगदी जागतिक बाजारपेठेतील थेट संबंध सुलभ करते, ज्यामुळे मध्यस्थांवरील अवलंबित्व कमी होते आणि संभाव्यतः चांगल्या किंमती मिळतात. हे सामूहिक प्रक्रिया आणि ब्रँडिंगद्वारे स्थानिक मूल्यवर्धनाला प्रोत्साहन देते, ज्यामुळे शेतकऱ्यांसाठी उत्पन्नाचा वाटा वाढतो आणि स्थानिक रोजगार निर्माण होतो. सहकारी रचना किंमतीतील अस्थिरता आणि हवामान बदलाच्या घटनांशी संबंधित जोखमींचे एकत्रीकरण करण्यास अनुमती देते. सहकारी समूह या मॉडेलमध्ये शेतकरी त्यांच्या भौगोलिक फायद्यांवर आधारित समूहांमध्ये एकत्र येणे, विशिष्ट पिके घेणे आणि प्रक्रिया करणे आणि जागतिक बाजारपेठांशी जोडणे समाविष्ट आहे. सामूहिक सहभागाला प्रोत्साहन देणे ही या मॉडेलची ताकद आहे. हे मॉडेल उत्पादकता वाढवते आणि बाजारपेठेतील प्रवेश सक्षम करते. हे एक सहक्रियात्मक वातावरण तयार करते; जिथे शेतकरी एकत्रितपणे इनपुट खरेदी करू शकतात, उत्पादन सुव्यवस्थित करु शकतात आणि मोठ्या प्रमाणात वृध्दी साध्य करण्यासाठी संसाधने सामायिक करू शकतात. हे मॉडेल उत्पादनात कार्यक्षमता वाढवते आणि उत्पादकांना आंतरराष्ट्रीय बाजारपेठांशी जोडून, सुधारित ब्रँडिंग, प्रमाणन आणि निर्यात सुलभ करून नफा वाढवते. हा समूह दृष्टिकोन पशुपालनासाठी देखील लागू केला जाऊ शकतो. सामुदायिक पशु गोठे (पशु गृह निर्माण) लहान आणि सीमांत शेतकऱ्यांसाठी उपयुक्त आहे. बहुतेक गरीब शेतकऱ्यांकडे दुभत्या जनावरांसाठी जागा नाही. दुग्ध प्रकल्पांसाठी सहकारी पशु गृह निर्माण सुविधा निर्माण करता येतील. याचा त्यांना फायदा होईल. अशी समूह शेती करताना काही अडचणी आहेत, त्या दूर केल्या पाहिजेत. विशेषतः भारतातील कृषी क्षेत्र हे लहान आणि सीमांत शेतकऱ्यांनी वैशिष्ट्यीकृत आहे, जे बहुतेकदा वेगवेगळ्या प्रदेशांमध्ये विखुरलेले असतात, जे उत्पादनाच्या प्रमाणात अडथळा आणतात. त्याचप्रमाणे अपुरे शीतगृह, वैज्ञानिक गोदाम आणि प्रक्रिया सुविधांमुळे, विशेषतः फळे आणि भाज्यांमध्ये, भारताला ५-१५ टक्के कापणीनंतरचे नुकसान सहन करावे लागते. अनेक शेतकऱ्यांना जागतिक बाजारपेठांमध्ये थेट प्रवेश नसतो, परिणामी मर्यादित नफा आणि अकार्यक्षम पुरवठा साखळी निर्माण होतात. प्रत्येक नवीन गोष्टीसाठी शेतकरी अडकलेले आहेत. त्या शक्यता दूर केल्या पाहिजेत. सरकारने आर्थिक सहाय्य, पायाभूत सुविधांच्या विकासासाठी प्रोत्साहने आणि सहकारी संस्थांच्या स्थापनेसाठी आणि वाढीसाठी अनुदानांसह धोरणात्मक पाठबळ द्यावे. कापणीनंतरचे नुकसान कमी करण्यासाठी आणि मूल्यवर्धन वाढवण्यासाठी साठवण सुविधा, शीतगृहे आणि कृषी प्रक्रिया युनिट्समध्ये गुंतवणूकीला प्राधान्य दिले पाहिजे. शेतकऱ्यांची नवीन तंत्रज्ञान आणि सर्वोत्तम पद्धती स्वीकारण्याची क्षमता वाढविण्यासाठी, उत्पादन कार्यक्षमता सुधारण्यासाठी विस्तार सेवा आणि कृषी प्रशिक्षण मजबूत केले पाहिजे. सहकारी क्लस्टर्स जागतिक स्तरावर स्पर्धा करू शकतील याची खात्री करण्यासाठी आंतरराष्ट्रीय भागीदारी, व्यापारी करार आणि निर्यात पायाभूत सुविधांद्वारे जागतिक बाजारपेठेत प्रवेश निर्माण करणे आवश्यक आहे.

## मुख्यमंत्र्यांनी दावोसमधून अनुभवला भारतातील पहिल्या आंतरराष्ट्रीय सायकलिंग ‘ग्रँड टूर’चा थरार



दैनिक आपला विदर्भ

**पुणे/दावोस/प्रतिनिधी** : महाराष्ट्राच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवणारी आणि भारतीय क्रीडा विश्वात नवा इतिहास घडवणारी ‘बजाज पुणे ग्रँड टूर’ या आंतरराष्ट्रीय सायकल स्पर्धेला आज सुरूवात झाली. देशातील ही पहिलीच आंतरराष्ट्रीय ‘ग्रँड टूर’ सायकल स्पर्धा असल्याने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दावोस येथील आपल्या व्यस्त कार्यक्रमात वेळ काढून स्पर्धेचे थेट प्रक्षेपण पाहिले.

‘बजाज पुणे ग्रँड टूर’ ला जागतिक स्तरावर ‘टूर डी फ्रान्स’सारख्या स्पर्धांना असलेली प्रतिष्ठा मिळली आहे. मुख्यमंत्री फडणवीस यांनी दावोस येथील औद्योगिक परिषदेसाठी जाण्यापूर्वी शुभारंभ कार्यक्रमात जगभरातील सायकलपटूंचे स्वागत केले होते. दावोस येथे राज्याच्या औद्योगिक विकासासाठी विविध उद्योग संस्थांशी सामंजस्य करार करण्यात व्यस्त असतानाही त्यांनी महाराष्ट्र आणि पुण्याची आठवण ठेवली. राज्याच्या क्रीडा संस्कृतीला चालना देण्यासाठी महत्त्वाच्या असलेल्या या स्पर्धेचा आनंद घेण्यासाठी त्यांनी सोबत असलेल्या अधिकाऱ्यांच्या लॅपटॉपवर स्पर्धेतील थरार अनुभवला.

या ऐतिहासिक क्षणाचे साक्षीदार होत असतांना त्यांनी सायकलपटूंच्या कौशल्याचेही कौतुक केले. सायकलपटूंना पुण्यात मिळणारा प्रतिसाद, इथेले उत्सवाचे स्वरुप, सायकलपटूंना प्रोत्साहन देण्यासाठी आलेली तरुणाई पाहून त्यांनी आनंद व्यक्त केला. ही स्पर्धा राज्यातील क्रीडा क्षेत्राला प्रेरक ठरेल आणि सायकलचे शहर ही पुण्याची जुनी ओळख नव्या रुपात पुढे येईल, असा विश्वास त्यांनी यावेळी व्यक्त केला.

मुख्यमंत्री फडणवीस दावोस येथे वर्ल्ड इकॉनॉमिक फोरमसाठी गेले आहेत. दिवसभराच्या व्यस्त कार्यक्रमात दोन्ही देशातील वेळांचा फरक लक्षात घेवून त्यांनी स्पर्धेच्यावेळी थेट प्रक्षेपण पाहण्याची इच्छा व्यक्त केली. मुख्यमंत्री सचिवालयाच्या अपर मुख्य सचिव अश्विनी भिडे, प्रधान सचिव डॉ. श्रीकर परदेशी, उद्योग विभागाचे प्रधान सचिव पी. अन्बलगन, विकास आयुक्त दिपेंद्रसिंह कुशवाह, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाचे मुख्य कार्यकारी अधिकारी पी.वेलारसू यांनी देखील थेट प्रक्षेपण पाहताना स्पर्धेचा आनंद घेतला.

एका बाजूला महाराष्ट्रात हजारो कोटी रुपयांची गुंतवणूक आणण्यासाठी विविध देशांतील उद्योगसमूहांसोबत सामंजस्य करार होत असताना, दुसऱ्या बाजूला राज्यातील क्रीडा क्षेत्रात घडणाऱ्या या ऐतिहासिक घडामोडीकडे दिलेले विशेष लक्ष क्रीडा क्षेत्राला निश्चितपणे प्रोत्साहन देणारे आहे. भारतामध्ये पहिल्यांदाच होत असलेल्या ‘ग्रँड टूर’ स्वरूपाच्या या स्पर्धेला जागतिक व्यासपीठावरून मिळालेली ही दाद क्रीडा क्षेत्रासाठी अभिमानास्पद ठरली आहे. आंतरराष्ट्रीय दर्जाचे नियम, अत्याधुनिक आयोजन आणि विविध देशांतील नामवंत सायकलपटूंचा सहभाग यामुळे ‘बजाज पुणे ग्रँड टूर’ने पुण्याला जागतिक सायकलिंगच्या नकाशावर ठळक स्थान मिळवून दिले आहे. मुख्यमंत्री फडणवीस यांनी दावोससारख्या आंतरराष्ट्रीय मंचावरून या स्पर्धेचा थरार अनुभवणे, हे आयोजक, खेळाडू तसेच क्रीडाप्रेमींसाठी मोठे प्रोत्साहन ठरले असून, यामुळे महाराष्ट्रात क्रीडा संस्कृती अधिक बळकट होण्यास निश्चितच चालना मिळणार आहे.

## श्री गुरु तेगबहादूर जी : मानवमूल्यांचा तेजस्वी दीपस्तंभ

जगात समानतेचा विचार हा नेहमीच संघर्षातून पुढे आलेला आहे. जात, धर्म, वंश, भाषा, लिंग, संपत्ती आणि सत्तेच्या आधारावर माणसामाणसांत भेद निर्माण करण्यात आले. अशा असमानतेविरुद्ध आवाज उठवणारे संत, विचारवंत आणि समाजसुधारक इतिहासात विरळाच. शीख परंपरेतील नववे गुरु श्री गुरु तेगबहादूर जी (१६२११६७५) हे अशाच महान व्यक्तिमत्त्वांपैकी एक होते. त्यांनी आपल्या विचारांतून, बाणीतून आणि सर्वोच्च बलिदानातून मानवी समानतेचा विश्वव्यापी संदेश दिला. त्यांच्या ३५० व्या बलिदान पर्वानिमित्त त्यांच्या महान कार्याचे स्मरण करणे प्रेरणादायी ठरेल. मानवी समानता म्हणजे सर्व मानव जन्मतः समान आहेत, त्यांच्यात कोणताही उच्च-नीच भेद असू नये, प्रत्येकाला स्वातंत्र्य, प्रतिष्ठा आणि न्याय मिळावा. ही संकल्पना आधुनिक लोकशाही, मानवाधिकार आणि संविधानांची मूलभूत चौकट आहे. मात्र, श्री गुरु तेगबहादूर जी यांनी हा विचार १७ व्या शतकात, जेव्हा समाज कर्मकांड, जातीयता आणि धार्मिक कट्टरतेने ग्रासलेला होता, तेव्हाच प्रत्यक्ष आचरणात आणला.

श्री गुरु तेगबहादूर जी यांच्या काळात भारतीय समाज अनेक स्तरांवर विभागलेला होता. त्यात जातीय विषमता, स्त्रियांचे दुय्यम स्थान, धार्मिक असहिष्णुता, जबरदस्तीचे धर्मांतर, गरीब व दुर्बल घटकांचे शोषण याचा प्रामुख्याने समावेश होता. मुघल सम्राट औरंगजेबाच्या काळात धर्माच्या नावाखाली अत्याचार वाढले होते. अशा वातावरणात मानवी समानतेचा विचार मांडणे आणि त्यासाठी उभे राहणे हे अत्यंत धाडसी कृत्य होते. श्री गुरु तेग बहादूर यांनी औरंगजेब याच्या विचारांना स्वतः चे बलिदान देऊन उत्तर दिले. त्यांच्या बलिदानामुळे हिंदू धर्माचे रक्षण झाले. श्री गुरु तेगबहादूर जी यांच्या तत्त्वज्ञानाचा केंद्रबिंदू म्हणजे ईश्वर एक असून तो सर्व मानवांत समानरीत्या वास करतो. त्यामुळे कोणताही माणूस उच्च किंवा नीच ठरत नाही.

त्यांच्या बाणीत ते स्पष्ट सांगतात की, ‘‘ईश्वर मंदिर, मशिद किंवा तीर्थस्थळापुरता मर्यादित नसून तो प्रत्येकाच्या अंतःकरणात आहे.’’ यातूनच मानवी समानतेचा मूलभूत विचार पुढे येतो. जर ईश्वर सर्वांत समान आहे, तर माणसांमध्ये भेद कसा असू शकतो ? असा प्रश्न त्यांनी समाजासमोर उपस्थित केला.

श्री गुरु तेगबहादूर जी यांनी बाह्य धार्मिक आडंबरांना नाकारले. कर्मकांड, तीर्थयात्रा, व्रत-वैकल्य यांमुळे माणूस श्रेष्ठ ठरत नाही, तर त्याची नैतिकता आणि करुणा त्याला श्रेष्ठ बनवते.

‘‘तीर्थ फिरौ, अरु दान करौ अंतर की मलु न उतरै’’ हा संदेश समाजातील त्या वर्गांसाठी अत्यंत महत्त्वाचा होता, ज्यांना धार्मिक विधीमध्ये वंचित ठेवले जात होते. श्री गुरु तेगबहादूर जी यांनी अप्रत्यक्षपणे सांगितले की, ईश्वरप्राप्तीसाठी कोणत्याही सामाजिक दर्जाची गरज नाही. गुरु परंपरेतच जातिभेदाला नकार दिला आहे. गुरु नानक देवांपासून सुरू झालेली ही परंपरा श्री गुरु तेगबहादूर जी यांनी अधिक ठामपणे पुढे नेली. सर्व मानव एकाच परमेश्वराची निर्मिती आहे , कोणालाही जन्माच्या आधारे श्रेष्ठत्व नाही आणि सेवा, साधना आणि सदाचार हाच खरा धर्म अशी शिकवण त्यांनी दिली यातून मानवी समानतेची सामाजिक पायाभरणी झाली. श्री गुरु तेगबहादूर जी यांचे मानवी समानतेतील सर्वात मोठे योगदान म्हणजे धर्मस्वातंत्र्याचा पुरस्कार.काश्मिरी पंडितांचे धर्मांतर जबरदस्तीने केले जात असताना त्यांनी त्या अन्यायाविरुद्ध आवाज उठवला. ते स्वतः शीख गुरु असूनही इतर धर्माच्या लोकांच्या रक्षणासाठी उभे राहिले.

हे कृत्य मानवी समानतेच्या इतिहासातील अद्वितीय उदाहरण आहे. ‘‘धर्म वेगळे असू शकतात, पण मानवतेचे मूल्य एकच आहे.’’हेत्यांनीसिद्धकेले. दिल्लीतील चांदणी चौक येथे दिलेले श्री गुरु तेगबहादूर जी यांचे बलिदान हे केवळ धार्मिक नव्हे, तर मानवी समानतेसाठी दिलेले बलिदान होते. त्यांनी आपल्या प्राणांची आहुती देऊन सांगितले की, कोणालाही जबरदस्तीने धर्म बदलायला लावणे हा अन्याय आहे, प्रत्येक माणसाला श्रद्धेचे स्वातंत्र्य आहे, सत्तेपेक्षा मानवतेचे मूल्य मोठे आहे. औरंगजेब जरी तलवारीच्या जोरावर सत्ता टिकवू शकला तरी गुरुजींनी सामाजिक व धार्मिक रक्षण करत इतिहासात अजरामर असे स्थान निर्माण केले. म्हणूनच त्यांना ‘‘हिंद दी चादर’’ असे संबोधले जाते. मानवी समानतेसाठी निर्भयता आवश्यक असते. श्री गुरु तेगबहादूर जी यांच्या बाणीत निर्भय जीवनाचा आदर्श दिसतो.

‘‘भय काहू को देत नहिं, नहिं भय मानत आन’’

जो स्वतः भयमुक्त आहे, तोच इतरांच्या समानतेचा सन्मान करू शकतो. भयावर उभा असलेला समाज कधीही समानतेकडे जाऊ शकत नाही, हे गुरु तेग बहादूर जी यांनी स्पष्ट केले.आजही जग जातीय संघर्ष, धार्मिक असहिष्णुता, वर्णद्वेष आणि सामाजिक विषमतेने ग्रासलेले आहे. अशा काळात श्री गुरु तेगबहादूर जी यांचे विचार अधिकच महत्त्वाचे ठरतात. भारतीय संविधानातील समता, स्वातंत्र्य आणि बंधुता, मानवाधिकारांची संकल्पना, धर्मनिरपेक्षतेचा विचार या सर्व मूल्यांची बीजे श्री गुरु तेगबहादूर जी यांच्या तत्त्वज्ञानात दिसतात.

श्री गुरु तेगबहादूर जी यांच्या विचारांचा शिक्षणातून प्रसार होणे आवश्यक आहे. म्हणजे मानवी समानतेचा संदेश समाजाच्या तळागाळापर्यंत सहज पोहोचवता येईल. मानवी समानता ही केवळ संकल्पना नसून ती जगण्याची पद्धत आहे, हे गुरु तेगबहादूर जी यांनी सिद्ध केले. त्यांच्या बाणीतून आत्मशुद्धीचा, तर त्यांच्या बलिदानातून निर्भयतेचा आणि सहिष्णुतेचा संदेश मिळतो. आजच्या असमानतेने ग्रस्त जगात श्री गुरु तेगबहादूर जी हे मानवतेचे नैतिक दिशादर्शक ठरतात. त्यांच्या विचारांचा स्वीकार केल्याशिवाय खऱ्या अर्थाने समतामूलक समाज निर्मिती शक्य नाही.

**प्रो. डॉ. दीपक मो. शिंदे**
परीक्षा नियंत्रक, केंद्रीय जन जाती विद्यापीठ,
विजयानगरम (विशाखापट्टणम )
माजी संचालक श्री गुरु गोबिंद सिंघ जी अध्यासन संकुल व संशोधन केंद्र, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड

## भारतीय संस्कृतीचा गौरव- श्री गुरु तेगबहादुर साहिब

‘हिंद दी चादर’, म्हणजेच भारतभूमीचे कवच, अशी शीखांचे नववे गुरु तेगबहादुर साहिब यांची जगाला ओळख आहे. गुरु तेगबहादुर साहिब यांच्या बलिदानाला ३५० वर्षे पूर्ण होत आहेत. या निमित्ताने महाराष्ट्र शासन आणि श्री गुरु तेगबहादुर साहिबजी ३५० वी शहिदी समागम राज्यस्तरीय समितीच्या वतीने नागपुरातील यशस्वी आयोजनानंतर आता नांदेड येथे २४ आणि २५ जानेवारी रोजी भव्य अशा आध्यात्मिक समागम कार्यक्रमाचे आयोजन होत आहे. या निमित्ताने गुरु तेगबहादुर साहिब यांच्या जीवनकार्यावर प्रकाश टाकणारा हा लेख....

सत्याचा मार्ग आणि अहिंसेचे तत्त्व हे भारतीय विचारांचे एक अविभाज्य अंग आहे. हे तत्त्व केवळ शारीरिक हिंसा न करण्याइतपत मर्यादित नसून, अगदी मनातही कोणाबद्दल द्वेष बाळगू नये, असा त्याचा व्यापक अर्थ आहे. भारतीय संस्कृतीने जगाला विविधतेत एकता जोपासण्याचा मंत्रही दिला. ‘एकम सत् विप्रा बहुधा वदंती’ म्हणजेच सत्य एकच आहे, परंतु विद्वान लोक ते वेगवेगळ्या प्रकारे मांडतात, हे ऋग्वेदातील सूत्र भारतीय संस्कृतीतील धार्मिक सहिष्णुता आणि सर्वधर्मसमभाव या मूल्यांचा मूळ आधार मानले जाते. जिथे पाश्चात्य संस्कृती उपभोगावर भर देते, तिथे भारतीय संस्कृती त्याग आणि बलिदानाला महत्त्व देते. या मूळ विचारांचे स्मरण येथील जनसमुदायाला सातत्याने करून देण्यासाठी अनेक महापुरुषांनी या भारतभूमीत जन्म घेतला. जगाला समता, सेवा आणि भक्तीचा मार्ग दाखविणाऱ्या शीख समुदायाच्या तेजस्वी परंपरेत जन्मलेले गुरु तेगबहादुर साहिब हे अशाच महापुरुषांपैकी आहेत.

गुरु तेगबहादुर यांचे बलिदान हा भारतीय मध्ययुगीन इतिहासातील समर्पणाच्या भावनेचा महत्त्वपूर्ण आणि शाश्वत अध्याय ठरतो. श्री गुरु नानकदेव असोत, श्री गुरु तेगबहादुर साहिब असोत की श्री गुरु गोविंद सिंह साहिब असोत, या साऱ्या महापुरुषांनी परकीय जुलूमशाहीच्या काळात भारतभूमीतील जनतेचे स्वत्व, आत्मसन्मान जागविण्याचे तसेच दिशाहीन समाजाला दिशा दाखविण्याचे कार्य केले आहे. त्यामुळे श्री गुरु तेगबहादुर साहीब यांचे स्मरण झाले की आजही त्यांचे विचार आणि




मानवतेसाठी त्यांनी दिलेल्या बलीदानाचा इतिहास डोळ्यापुढे सरकतो.

जन्म आणि पार्श्वभूमी

गुरु तेगबहादुर साहिब यांचा जन्म १६२१ मध्ये अमृतसर येथे शीखांचे सहावे गुरु श्री हरगोविंद साहिब यांच्या घरी झाला. गुरु हरगोविंद साहिब यांच्या पाच पुत्रांपैकी ते धाकटे होते. ते अध्यात्मिक रंगात रंगलेले, अंतर्मुख आणि मौनप्रिय होते. गुरुपदाच्या गादीची जबाबदारी स्वीकारल्यावर गुरु तेगबहादुर साहिब यांनी शीख समाजाला संघटित करण्याचे प्रयत्न सुरु केले. १६६५ च्या सुमारास त्यांनी आनंदपूर नावाचे स्थळ वसवले. पुढे ते ‘आनंदपूर साहिब’ म्हणून प्रचलित झाले. शीख धर्मातील अत्यंत पवित्र अशा स्थळांपैकी ते एक मानले जाते. गुरु तेगबहादुर साहिब यांनी तत्कालीन बंगाल, बिहार, आसामसह देशातील अनेक भागांना भेटी देऊन आपल्या विचारांचा प्रचारप्रसार केला. १६६६ मध्ये पाटणा (पाटणा साहिब) येथेच त्यांच्या घरी गुरु गोविंदसिंह यांचा जन्म झाला. ते शीखांचे दहावे गुरु होत.

साहित्य, उपदेश आणि आध्यात्म

गुरु तेगबहादुर साहिब हे केवळ धर्मगुरुच नव्हते, तर ते उत्तम साहित्यिक आणि रचनाकारही होते. त्यांनी आपल्या अनेक रचनांच्या माध्यमातून शीख तत्त्वज्ञानाचा प्रचार आणि प्रसार केला. सहज सोप्या भाषेसह त्यांचा भावप्रवाह अतिशय सशक्त आहे. त्यांच्या साहित्याचा केंद्रबिंदू प्रामुख्याने वैराग्य, नाम ‘सिमरन’ (देवाचे स्मरण) आणि जीवनातील नश्वरता हाच ठरतो. त्यांचे विवेचनाचे विषयही धार्मिक, तत्त्वमिमांसक आणि जीवनातील क्षणभंगुरता दर्शवणारे आहेत. गुरु तेगबहादुर साहिब यांच्या रचनांना गुरु ग्रंथ साहिबमध्ये अत्यंत महत्त्वाचे स्थान आहे. त्यांच्या रचनांना सामान्यतः ‘शबद’ किंवा भजन म्हटले जाते. ज्यांत ईश्वर, मानवी संबंध, सेवा, मनशरीर, मृत्यु, प्रतिष्ठा आणि मानवी स्थिती यांसारख्या विषयांचा व्यापक आवाका आढळून येतो.

संघर्षाचा कालखंड

गुरु तेगबहादुर सिंह साहीब यांच्या जीवनकार्याचा हा कालखंड भारतीय इतिहासातील अत्यंत आव्हानात्मक असा काळ मानला जातो. परकीय आक्रमकांनंतर दाखल झालेल्या तत्कालीन शासकांची सत्ता भारताच्या बऱ्याच भागात स्थिरावली होती. या सत्तेच्या कट्टरतेचा आणि आक्रमक विस्ताराचा असा काळ होता. मध्ययुगातील हाच काळ तत्कालीन शासकांच्या जुलमी राजवटीचाही मानला जातो. सत्ताधीश हे धार्मिकदृष्ट्या संकीर्ण आणि अत्यंत कडव्या मनोवृत्तीचे होते, असे इतिहास सांगतो. त्यामुळे स्वाभाविकपणे अन्य समुदायांसाठी हा काळ अतिशय खडतर आणि अस्थिरतेने परिपूर्ण असा काळ मानला जातो. अशा या प्रतिकूल परिस्थितीत गुरु तेगबहादुर यांनी अत्याचाराचा प्रतिकार अत्याचाराने नव्हे तर त्यागाने केला.

सर्वोच्च बलिदान

गुरु तेगबहादुर साहीब यांच्या जीवनातील सर्वात महत्त्वाचा अध्याय म्हणजे त्यांचे सर्वोच्च बलिदान. साधरणतः १६७५ सालचा तो काळ होता. सत्ताधाऱ्यांच्या अत्याचाराने त्रस्त झालेल्या काश्मिरी पंडिताचे काही प्रतिनिधी आनंदपूर साहीब येथे गुरु तेगबहादुरांकडे मदत मागण्यासाठी आले होते. या लोकांना सक्तीने धर्म स्वीकारण्यास भाग पाडले जात होते. काश्मिरी पंडितांची ही व्यथा ऐकून गुरु तेगबहादुर साहीब अतिशय धीरगंभीर झाले होते. अशा संकटापासून वाचण्यासाठी आता बलिदानाची गरज आहे, असे उत्तर त्यांनी यावर दिले. ‘जर आमच्या गुरुंनी धर्मांतर केलं, तर आम्ही सर्व स्वतःहून तुमचा धर्म स्वीकारू’, असे सत्ताधीशाला जाऊन सांगण्याची सूचना त्यांनी काश्मिरी पंडितांना केली. पुढे गुरु तेगबहादुर साहीब हे दिल्लीला पोहचल्यावर बादशहाने त्यांना कैद केले. त्यांना प्रलोभने दाखविली गेली, धर्म स्वीकार करण्यास सांगण्यात आले. गुरुजींनी या दोन्ही गोष्टी नाकारल्या. त्यांच्या समक्षच त्यांच्या शिष्यांना शहीद करण्यात आले. पण, गुरु तेगबहादुर साहीब हे आपल्या निश्चयापासून अजिबात ढळले नाहीत. त्यांनी बादशहाचे आदेश मानण्यास नकार दिला. संतापलेल्या बादशहाने त्यांचे शीर धडावेगळे करण्याचे आदेश दिले. तो आदेश अखेर अंमलात आणला गेला. गुरु तेगबहादुर साहीब यांचे सर्वोच्च बलिदान ज्या ठिकाणावर झाले, ते ठिकाण आज दिल्लीच्या चांदणी चौक परिसरातील ‘सीस गंज साहिब’ गुरुद्वारा म्हणून ओळखले जाते.

‘जर माझ्या बलिदानानं निरपराध लोकांच्या श्रद्धेचं रक्षण होणार असेल, तर तेच माझं सर्वोच्च धर्मकार्य ठरेल’, असा संदेश त्यांनी त्यावेळी दिला होता. हे शब्द केवळ त्यागाचे नव्हते, तर संपूर्ण मानवतेच्या रक्षणाची घोषणा करणारे होते. धार्मिक स्वातंत्र्य आणि मानवतेची सर्वोच्च मूल्य जपण्यासाठीच त्यांनी हा निर्णय घेतला होता. ‘सीस गंज साहिब’ गुरुद्वारा आजही त्यांचा त्याग आणि मानवतेप्रती समर्पणाची साक्ष देतो.

मानवतेचा संदेश

शीखांचे गुरु असूनही गुरु तेगबहादुर साहीब यांनी देशाचे रक्षण करण्यासाठी स्वतःला वाहून घेतले होते. ते सर्व धर्मांना समान मानणारे होते. सर्व मानव हे एकाच परमात्म्याचे पूत्र आहेत, अशीच त्यांची शिकवण होती. धर्म म्हणजे कर्तव्य आणि आदर्श जीवन जगण्याचा मार्ग आहे, हा संदेश त्यांनी समस्त मानवजातीला दिला आहे. त्यांचा हा संदेश आजही प्रासंगिक ठरतो.

**रमाकांत दाणी,**
**प्रसिद्धी समन्वयक,**
**संचालक माहिती व जनसंपर्क कार्यालय,नागपूर.**

DAINIK AAPLA VIDHARBH-Printed by Rameshwar Vishwanath Sakalkar & Published by DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Printed at Shubham printing press near tahsil office Mehkar-443301 (M.S.) and Published at mehkar- malegaon road near polics Station Dongaon Dist. Buldana-443301 (Mah.) Editor DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Mob.No.97672 33034 Title-Code:- MAHMAR52707

हे पत्र प्रकाशक, मालक देविदास माधवराव खनपटे यांनी शुभम प्रिंटिंग प्रेस तहसील कार्यालयाजवळ मेहकर जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथे छापून मेहकर मालेगाव रोड पोलीस स्टेशन समोर डोणगाव, जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथून प्रकाशित केले. मुद्रक रामेश्वर विश्वनाथ साकळकर, संपादक-देविदास माधवराव खनपटे मोबा.९७६७२ ३३०३४ पीआरबी कायद्यानुसार छापलेल्या मताशी सहमत असेलच असे नाही, वादविवाद फक्त मेहकर न्यायालया अंतर्गत, (टिप: प्रकाशित

## गळ्यात खिळ्यांचा पट्टा, कांद्याची माळ; शिरूरमध्ये उमेदवाराची अनोखी एन्ट्री



**पुणे/प्रतिनिधी :** शिरूर तालुक्यातील रांजणगाव गणपती पंचायत समिती गणासाठी उमेदवारी अर्ज भरण्यासाठी पिंपरी दुमाला येथील उमेदवाराने अनोख्या पद्धतीने अर्ज दाखल करत सर्वांचे लक्ष वेधून घेतले. गळ्यात खिळ्यांचा पट्टा आणि कांद्याची माळ घालून संबंधित उमेदवार थेट शिरूर येथील अर्ज भरण्याच्या ठिकाणी पोहोचले.

पंचायत समिती गणातील मूलभूत सुविधा, नागरिकांच्या समस्या, तसेच सध्या वाढलेली बिबट्याची दहशत, कांदा बाजारातील घसरलेले दर आणि शेतकऱ्यांचे प्रश्न याकडे लक्ष वेधण्यासाठी हा आंदोलनात्मक प्रकार केल्याचे उमेदवाराने सांगितले.

या अनोख्या एन्ट्रीमुळे निवडणुकीच्या वातावरणात चर्चेला उधाण आले असून परिसरातील राजकीय हालचालींना वेग आला आहे.

## स्मृती मानधनासोबत लग्न मोडलं, पलाशने घेतला मोठा निर्णय, मराठी अभिनेत्याची मिळाली साथ, फोटो पोस्ट करताच झाले ट्रोल

**मुंबई/प्रतिनिधी :** भारतीय महिला क्रिकेट संघाची स्टार क्रिकेटपटू स्मृती मानधना आणि बॉलीवूडचा संगीतकार पलाश मुच्छल गेल्या काही महिन्यांपासून आपल्या वैयक्तिक आयुष्यामुळे चर्चेत होते. स्मृती आणि पलाशचं लग्न मोडलं. दोघांनीही समाज माध्यमांवर पोस्ट करून याबाबत माहिती दिली होती. लग्न मोडल्यानंतर काही दिवसातच स्मृती पुन्हा एकदा मैदानात परतली. आता पलाशनेही स्मृती सोबत लग्न मोडल्यानंतर पुन्हा एकदा कामाला सुरुवात केली आहे. आपल्या करियर बाबत पलाशनी मोठा निर्णय घेतलाय. आणि या निर्णयात त्याला एका मराठमोळ्या अभिनेत्यांनं साथ दिली आहे.

पलाशला मराठमोळ्या अभिनेत्याची साथ

संगीतकार पलाश मूच्छल स्मृती सोबत लग्न मोडल्यानंतर काही काळ प्रसिद्धझोतापासून दूर होता. पण त्यांना आता पुन्हा कामाला सुरुवात केली असून आपल्या आगामी चित्रपटाची घोषणा केली आहे. पलाशच्या या सिनेमात मराठमोळा अभिनेता श्रेयस तळपदे मुख्य भूमिका साकारणार आहे. विशेष म्हणजे पलाश या चित्रपटाचा दिग्दर्शक असणार आहे. याबाबत एका चित्रपट समीक्षकाने केलेली पोस्ट सध्या चर्चेचा विषय ठरली आहे.

पलाश मूछलच्या या नव्या कोऱ्या प्रोजेक्टसाठी मराठमोळ्या श्रेयस तळपदेने त्याच्याशी हातमिळवणी केल्याचे बोलले जात आहे. सोशल मीडियावर चर्चा रंगली आहे. पलासच्या पहिल्याच दिग्दर्शनात श्रेयस मुख्य भूमिकेत दिसणार आहे. या दोघांचा फोटो सोशल मीडियावर व्हायरल होतोय. या चित्रपटाचं नाव काय कथानक काय असणार याविषयी अजून कोणतेही माहिती समोर आलेली नाही. पण लवकरच या सिनेमाचं शूट पलाश मूच्छल सुरू करणार आहे असं या पोस्टमध्ये सांगण्यात आलं आहे. चित्रपट समीक्षक तरण आदर्श यांनी ट्विट करत ही माहिती दिली आहे.

नेटकऱ्यांनी केलं पलाशला ट्रोल

श्रेयस तळपदे आणि पलाश मुच्छल यांच्या एकत्रित प्रोजेक्टला नेटकऱ्यांनी चांगलंच ट्रोल केलं आहे.काहींनी फोटो पाहून 'या फोटोतून चीटरला काढून टाका ' असं लिहिलंय . अनेक नेटकऱ्यांनी चित्रपटाला नाव सुचवले आहे. काहींनी लिहिलं ' या चित्रपटाचे नाव 'अ नाइट बिफोर वेडिंग ' असायला पाहिजे. काहींनी म्हटले सनम बेवफा म्हटलंय. एका युजरने लिहिले 'किती लाजिरवाणी गोष्ट आहे .फ्रेम मध्ये दोघेजण आहेत.

# दावोसमध्ये पहिल्याच दिवशी १४ लाख ५० हजार कोटींचे सामंजस्य करार

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई /प्रतिनिधी :** भारतातील उद्योग आणि गुंतवणूक क्षेत्रासाठी महाराष्ट्रच गेटवे-ऑफ-इंडिया' असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे विधान खरे ठरवणारे तब्बल १४ लाख ५० हजार कोटींचे गुंतवणूक करार पहिल्याच दिवशी करण्यात आले. या गुंतवणूकीसोबतच राज्यात १५ लाख रोजगार संधी निर्माण होणार आहेत.

महाराष्ट्र शासनाच्या उद्योग, गुंतवणूक आणि सेवा विभागाच्या माध्यमातून यंदा विविध विभागांनी आणि विविध क्षेत्रातील उद्योगांच्या प्रतिनिधी समवेत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उद्योग मंत्री उदय सामंत यांच्या प्रमुख उपस्थितीत या सामंजस्य करारावर स्वाक्षऱ्या केल्या आहेत.

हरित ऊर्जा, अन्न प्रक्रीया, पोलाद निर्मिती, आयटी-आयटीईस, डाटा सेंटर्सह ईव्ही-ऑटोमोबाईल, जहाज बांधणी, डीजिटल इन्फ्रा अशा विविध क्षेत्रातील ही गुंतवणूक मुंबईसह राज्याच्या रत्नागिरी, पालघर, गडचिरोली, अहिल्यानगर या भागात पोहचणार असल्याने, तेथे उद्योग वाढीसह मोठ्या प्रमाणा रोजगार निर्मितीला चालना मिळणार आहे.

वर्ल्ड इकॉनॉमिक फोरमच्या वार्षिक बैठकीकरिता मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उद्योग मंत्री डॉ. उदय सामंत यांच्यासह महाराष्ट्र शासनाच्या विविध विभागाचे प्रतिनिधीमंडळ दावोस येथे उपस्थित आहे. दावोस मधील पहिल्याच दिवसापासून जगभरातील विविध क्षेत्रातील उद्योगांनी महाराष्ट्रात गुंतवणुकीसाठी स्वारस्य दर्शवणे सुरु केले. यातून गुंतवणुकीचा मोठा ओघ सुरु झाल्याने महाराष्ट्र पॅव्हेलियनमध्ये उत्साहाचे चित्र निर्माण झाले. पुढील दोन दिवसांत विक्रमी गुंतवणूक येणार

येत्या दोन दिवसात दावोसमध्ये एआय, क्वांटम कंम्प्युटींग, डीजिटल इन्फ्रास्ट्रक्चर, यांसह फिनटेक, लॉजिस्टिक्स अँण्ड इन्फ्रास्ट्रक्चर तसेच जहाज बांधणी, ईव्ही, अपारंपरिक ऊर्जा क्षेत्रातील आणखी काही उद्योग घटकांशीही गुंतवणूकीचे सामंजस्य करार होणार आहेत. त्यादृष्टीने त्यांच्या प्रतिनिधींशी, बोलणी -चर्चांच्या फेऱ्या सुरू करण्यात आल्या आहेत.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या निर्देशानुसार गतवर्षी स्थापन




करण्यात आलेल्या महाराष्ट्र उद्योग, व्यापार आणि गुंतवणूक सुविधा कक्ष (श्अघ्ऊठघ) या गुंतवणूक आणि उद्योग सुलभतेला प्रोत्साहन देणाऱ्या समर्पित संस्थात्मक व्यवस्थेमुळे यंदा गुंतवणूकदार, उद्योग क्षेत्राचा महाराष्ट्राकडील ओघ आणखी वाढला आहे.

सामंजस्य करार पुढीलप्रमाणे

महाराष्ट्र सरकार-काल्सबर्ग क्षेत्र: अन्न प्रक्रिया आणि कृषी गुंतवणूक: ५०० कोटी रोजगार : ७५०

महाराष्ट्र सरकार- योकी ग्रीन एनर्जी प्रा. लि. क्षेत्र: नविनिकरणीय ऊर्जा गुंतवणूक: ४ हजार कोटी रोजगार : ६ हजार ठिकाण: पालघर/एमएमआर

महाराष्ट्र सरकार-बीएफएन फॉर्जिंग्स क्षेत्र: स्टील गुंतवणूक: ५६५ कोटी रोजगार : ८४७ ठिकाण: पालघर/एमएमआर

एमएमआरडीए-सुमिटोमो रियालिटी गुंतवणूक: सुमारे ८ बिलियन डॉलर्स रोजगार : ८० हजार.

एमएमआरडीए-के. रहेजा गुंतवणूक: सुमारे १० बिलियन डॉलर्स रोजगार : एक लाख.

एमएमआरडीए-अल्टा कॅपिटल/पंचशील गुंतवणूक: सुमारे २५ बिलियन डॉलर्स रोजगार : २ लाख ५० हजार.

एमएमआरडीए-एसबीजी समूह क्षेत्र: लॉजिस्टिक्स गुंतवणूक: सुमारे २० बिलियन डॉलर्स रोजगार : ४ लाख ५० हजार.

एमएमआरडीए-आयआयएसएम ग्लोबल गुंतवणूक: सुमारे ८ बिलियन डॉलर्स रोजगार : ८० हजार.

एमएमआरडीए-जायका धोरण आणि स्ट्रॅटेजी पार्टनर

एमएमआरडीए-सेम्बकॉर्प डेवलपमेंट लि. सिंगापूर एकीकृत इंडस्ट्रियल पार्कसाठी नॉलेज पार्टनर

एमएमआरडीए-टेक्निकल युनिव्हर्सिटी, मुनीच, जर्मनी शाश्वत नागरी वाहतूक प्रणाली

महाराष्ट्र सरकार-सुरजागड इस्पात क्षेत्र: स्टील गुंतवणूक: २० हजार कोटी रोजगार: ८ हजार. ठिकाण: गडचिरोली

महाराष्ट्र सरकार-लोढा डेव्हलपर्स क्षेत्र: आयटी, डेटा सेंटर्स गुंतवणूक: १ लाख कोटी रोजगार: १ लाख ५० हजार.

ज्यांनी महाराष्ट्रात आणखी गुंतवणूक आणि विस्तार करण्याची तयारी दर्शवली असे: कोकाकोला, आयकिया, स्कोडा ऑटो.

## नेहा कक्करनं घटस्फोटाच्या अफवांवर लावला पूर्णविराम, दिलं सोशल मीडियाद्वारे स्पष्टीकरण...

**मुंबई/प्रतिनिधी :** गायिका नेहा कक्कर अलीकडील सोशल मीडिया पोस्टमुळं चर्चेत आली होती. तिची पोस्ट सोशल मीडियावर इतकी व्हायरल झाली होती, की त्यामुळं तिला अनेक प्रश्न चाहते विचारू लागले होते. तिनं आपल्या पोस्टमध्ये लिहिलं होतं, की ती नातेसंबंध आणि कामापासून ब्रेक घेत आहे. यानंतर तिनं काही मिनिटांमध्ये आपली पोस्ट सोशल मीडियावरून डिलीट केली होती. यानंतर सोशल मीडियावर तिच्या वैयक्तिक जीवनाबद्दल काही यूजर्स हे अंदाज बांधत होते. गायिकाच्या घटस्फोटच्या बातम्या या सोशल मीडियावर व्हायरल झाल्या होत्या. आता नेहानं उद्भवलेल्या घटस्फोटाच्या अफवांना स्पष्टपणे फेटाळून लावल्या आहेत. गायिकेनं तिचे मौन सोडले आहे आणि लोकांना सत्य कळवले आहे. सोमवारी, नेहानं इंस्टाग्राम स्टोरीजवर स्पष्ट केलं की, तिच्या पतीला किंवा कुटुंबाला यात ओढले जाऊ नये. तिनं लिहिलं, 'मित्रांनो, कृपया माझ्या निष्पाप पतीला किंवा माझ्या प्रेमळ कुटुंबाला यात ओढू नका. ते माझ्या ओळखीचे सर्वोत्तम लोक आहेत आणि मी त्यांच्या पाठिंब्यामुळेच आहे.

# मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेसाठी आधार प्रमाणीकरण

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी :** राज्यातील महिलांचे आर्थिक स्वातंत्र्य वाढवणे तसेच त्यांच्या आरोग्य व पोषणामध्ये सुधारणा करून कुटुंबातील निर्णायक भूमिका अधिक सक्षम करण्याच्या उद्देशाने राज्य शासनाने मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना सुरू केली आहे. या योजनेंतर्गत पात्र लाभार्थी महिलांची पडताळणी व प्रमाणीकरणासाठी ई-केवायसी माध्यमातून आधार प्रमाणीकरणास मान्यता देण्यात आली आहे. योजनेतील लाभार्थ्यांनी १८ नोव्हेंबर २०२५ पर्यंत ई-केवायसी करणे आवश्यक होते. ऑनलाईन ई-केवायसी करताना पतीचे किंवा वडिलांचे आधार क्रमांक नोंदवून ओटीपीद्वारे प्रक्रिया पूर्ण करण्यात येत होती.

मात्र विधवा, परित्यक्ता, कौटुंबिक हिंसाचारग्रस्त, घटस्फोटीत, एकल महिला तसेच ज्यांचे वडील मृत्यूपावले आहेत, अशा महिलांना ई-केवायसी करताना अडचणी येत होत्या. या पार्श्वभूमीवर ई-केवायसी करण्याची मुदत ३१ डिसेंबर २०२५ पर्यंत वाढविण्यात आली होती. तसेच पर्याय निवडीत झालेल्या चुका दुरुस्त करण्यासाठी एडिट ऑप्शन देण्यात आला होता.

१८ नोव्हेंबर २०२५ पर्यंत ऑनलाईन ई-केवायसी करताना पर्याय देण्यात आले होते. यात माझ्या कुटुंबातील सदस्य नियमित कायम कर्मचारी म्हणून सरकारी विभाग, उपक्रम, मंडळ, भारत सरकार किंवा राज्य सरकारच्या स्थानिक संस्थेमध्ये कार्यरत नाही किंवा सेवानंतर निवृत्तीवेतन येत नाहीत. पर्याय: होय/नाही, माझ्या कुटुंबातील केवळ एक विवाहीत व एक अविवाहीत महिला योजनेचा लाभ घेत आहे. पर्याय होय/नाही, या पर्यायापैकी लाभार्थ्यांनी नाही हा पर्याय निवडल्यामुळे लाभार्थ्यांचे अर्जामध्ये रिमार्क १आणि स्टेटस रिजेक्ट दाखवत आहे. त्यामुळे अर्जदाराचे लाभ बंद झाले आहेत.

लाभार्थ्यांनी ऑनलाईन स्टेटस तपासणी करावयाची असल्यास सेतू केंद्र, सायबर कॅफे, बाल विकास प्रकल्प अधिकारी कार्यालय, पंचायत समिती, संबंधीत तालुका, बाल विकास प्रकल्प अधिकारी, नागरी प्रकल्प किंवा जिल्हा महिला व बाल अधिकारी, बुलढाणा येथे तपासणी करु शकतील. त्यासाठी केवळ जिल्हास्तरावरील कार्यालयात येण्याची आवश्यकता नाही. ई-केवायसी प्रक्रीया पुन्हा करण्यासाठी एडीट ऑप्शन पुन्हा उपलब्ध करून देण्यासाठी पाठपुरावा सुरु असल्याची माहिती जिल्हा महिला व बाल अधिकारी अमोल डिघुळे यांनी दिली आहे.

## दोन्ही राष्ट्रवादी एकत्र येणं म्हणजे बिर्याणीत गुळवणी मिसळण्यासारखं; दादांना सत्तेतून बाहेर यावे लागेल, शरद पवारांच्या आमदाराचा एकत्र येण्याला विरोध

**सोलापूर/प्रतिनिधी :** राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांचे विचार वेगळे आहेत. उपमुख्यमंत्री अजित पवार सत्तेसोबत आहेत. त्यामुळे दोन्ही राष्ट्रवादी एकत्र येतील, असे वाटत नाही. यायचं असेल, तर अजित पवारांना सत्तेतून बाहेर पडावं लागेल. शरद पवारांच्या विचारांनी पुढे जावं लागले, अशी भूमिका राष्ट्रवादी (शरद पवार)चे आमदार उत्तम जानकर यांनी मांडली आहे. तर दोन राष्ट्रवादी एकत्र येतील असे वाटत नाही, हे म्हणजे बिर्याणी मध्ये गुळवणी मिसळण्यासारखे होईल, असा खोचक टोला शरद पवार गटाचे माळिशरसचे आमदार उत्तम जानकर यांनी लगावला आहे. अजित पवार सध्या सत्तेबरोबर आहेत त्यामुळे दोन राष्ट्रवादी एकत्र यायच्या असतील तर अजित दादांना सत्तेतून बाहेर पडावे लागेल असाही टोला आमदार जानकर यांनी अजित पवार यांना लगावला आहे.

राष्ट्रवादीच्या फुटी नंतर अजित पवार यांच्यावर अत्यंत टोकाची टीका करणारे म्हणून उत्तम जानकर राज्यभर प्रसिद्ध झाले होते. अगदी बारामती लोकसभेला सुनेत्रा पवार यांच्या विरोधातही जाऊन आमदार जानकर यांनी अजित दादांवर सडकून टीका केली होती. आता पुन्हा दोन राष्ट्रवादी एकत्र येण्याच्या हालचाली सुरू झाल्यानंतर आमदार उत्तम जानकर यांनी अजित पवारांच्या विरोधातला राग व्यक्त करताना अजित दादांना त्यांचे धोरण ठरवावे लागेल असे सांगितले.

अजित दादा हे सध्या सत्य बरोबर आहे त्यामुळे त्यांना सत्ता सोडून शरद पवारांच्या विचाराने पुढे जावे लागेल असे सांगत दोन राष्ट्रवादी एकत्र येतील असे मला वाटत नसल्याचाही विश्वास आमदार उत्तम जानकर यांनी बोलून दाखवला आहे. पवार साहेबांचा विचार वेगळा आहे आणि अजितदादांचा वेगळा आहे त्यामुळे दोन राष्ट्रवादी एकत्र यायचे असतील तर अजितदादांनी सत्तेतून बाहेर पडावं आणि पवार साहेबांच्या विचाराने पुढे चालावे असा सल्ला जानकारी यांनी दिला आहे. कोणताही पक्ष हात धोरणावर चालत असतो आणि आम्ही पवार साहेबांच्या विचारावर आणि धोरणावर काम करतो असे जानकर यांनी सांगितले.

## शब्दकोडे क्र. 68

आडवे शब्द

१. व्याकूळ, घाबरलेला ५. असामान्य ८. पान (सं.) ९. दृष्ट १०. 'पुरी'चे दैवत १२. मोठा नगारा १३. नवरदेव १४. व्याख्यान १५. रेशमचा किडा १६. अंदाज, तर्क १८. राबता, जाणे-येणे २०. प्रमाणपत्र २२. मच्छर २४. स्वाभिमानी स्त्री २५. पल्लवीने रेणुका शहाणेच्या चित्रपटात साकारलेली भूमिका २७. धमकी, श्वास ३०. व्यवस्थित ३२. अखबार ३३. कासंडी, दुधाची घागर ३४. हाताचा एक अवयव ३६. व्यवस्था ३८. ऋण, व्याजाने घेतलेली रक्कम ४०. जहाजांचा मुक्काम ४१. फळातील द्रव ४२. हाताने सूत काढून हातमागावर विणलेले कापड ४३. पंगत ४५. दरोडा ४७. अपशकुन ५०. नकला करणारा ५२. हिशोबाची एक बाजू ५४. यात्रेत नियमित जाणारा ५६. दुधाच्या वड्या ५८. शेजारी शेजारी ६०. झकास ६१. एक मंगलवाद्य ६३. निवासस्थान ६४. समोरसमोरची चकमक ६५. पूर्णपणे ६७. एक सुगंधी वनस्पती ६८. समुद्र ७०. रमणीय ७१. असुर, दानव, देवांचा शत्रू ७२. गाजावाजा ७३. किंमत, पैसा ७४. विशेष ७५. चंद्र ७६. निकट, जवळ ७८. भूकंप ८०. मलई ८१. फरक ८२. घराणे ८३. रंग बदलणारा प्राणी

उभे शब्द

१. यजमानीण २. पहारेकरी ३. कलंक ४. सुकुमार ५. न थांबता ६. धैर्य ७. दारूचा एक प्रकार ८. उद्याच्या नंतरचा दिवस ११. गर्दीचा विळखा १३. भावाची पत्नी १५. कृत्रिम शीतपे (इंग्रजी) उन्हाळ्यात या कंपन्यांमध्ये शीतयुद्ध रंगते! १७. धार्मिक पर्यटन १८. महिला, बाई १९. प्रफुल्लित २१. पटपट, वेळ न दवडता २३. मानसिक धक्का (हिंदी) २६. वस्तूचा छोटा तुकडा २८. समोरच्याच्या मनातील विचार ओळखणारा २९. वार्ताहर ३०. पाणी ३१. आई-वडील ३३. सूत काढण्याचे एक साधन ३५. आरोळी, ललकारी ३७. जिव्हा ३९. मळलेले ४०. आपला नसलेला ४४. अरण्य ४६. अंजन ४८. चेष्टेखोर ४९. न वापरलेली, नवी ५१. दुलई ५३. चौसोपी वाड्यातील मधली खोली ५५. लेखणी ५६. भिऊन पळ काढणारा ५७. भटकणारा ५९. आशीर्वाद ६१. माळ, हार ६२. नुकतेच आगमन झालेला, नवखा ६४. तुलनेतील सारखेपणा ६५. अनुत्तीर्ण ६७. चर्चा ६८. लाकडाची उत्कृष्ट जात ६९. रानरेडा ७०. सुंदर तरुणी ७३. दरवाजा ७४. मृत्तिकापात्र ७५. सुविधा ७७. मगज ७८. द्रव्य ७९. बीजगणितात आढळणारा श्रीकृष्णाचा मामा



### शब्दकोडे क्र. 67 चे उत्तर

आडवे उत्तर

१.प्रवासी ३.जालशय ७.ठाण मांडणे ११.नजर मरणे १२.जर १३.साग १४.समूह १६.नीरा १७.कबर १८.अमर १९.कदर २०.सकवार २१.सहाण २४.माजघर २६.जत्रा २७.ना हरकत प्रमाणपत्र ३१.नेता ३२.संघर्ष ३३.जागा ३५.तरतरीत ३७.नरवर ३९.तरट ४२.मळा ४४.वस्त ४६.ठकविणे ४८.टवकारणे ५०.रसद ५२.उणे ५३.शारदा ५६.वळ ५७.पल ५८.दमट ६०.परत परत ६३.विकार ६४.पराग ६५.मासा ६७.वाचा ६९.तनय ७०.कडकडाट ७१.अनाकलनीय ७३.दावा ७५.भाट ७६.रीस ७७.जनन मरण ७८.कोट

उभे उत्तर

१.प्रशंसक २.सीताहरण ३.जननी ४.लाजरा ५.शर ६.यम लोक ७.ठाणेकर ८.मांजर ९.डर १०.आगरकर १३.साम १५.मूद १८.अनुज २०.सणक २१.सह २२.हारजीत २३.ऋण २४.मात्र २५.घरघर २६.जन्मजात २७.नाताळ २८.तळतळात २९.माहूत ३०.पवन ३२.संवत्सर ३४.गारठणे ३६.रम ३८.रव ४०.टक ४१.कणेर ४३.वरवर ४५.वादळ ४७.विशाल ४९.वजा ५१.सवत ५२.उतावीळ ५४.दादरा ५५.कूप ५७.परवाना ५९.मग ६०.पसायदान ६१.तडक ६२.रजक ६५.मान ६६.वटवट ६८.चाकरी ७१.अट ७२.लस ७४.वाम

# हक्काच्या लाभासाठी लाडक्या बहिणींचा आक्रोश

## शपथपत्रे घेऊन हजारो महिलांचा जिल्हाधिकाऱ्यांवर मोर्चा







**दैनिक आपला विदर्भ**

**बुलढाणा/प्रतिनिधी :** मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेअंतर्गत लाभार्थी महिलांनी केवायसी प्रक्रिया पूर्ण करूनही विविध तांत्रिक व प्रशासकीय अडचणींमुळे बुलढाणा जिल्ह्यातील सुमारे ३० हजार महिलांचा लाभ अचानक थांबविण्यात आल्याने महिलांमध्ये तीव्र संभ्रम व असंतोषाचे वातावरण निर्माण झाले आहे.

महिन्याच्या घरखर्चासाठी या योजनेवर अवलंबून असलेल्या महिलांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. या पार्श्वभूमीवर खामगाव शहर व तालुक्यातील हजारो लाडक्या बहिणींनी ओबीसी महासंघाचे पदाधिकारी गणेश चौकशे यांच्या नेतृत्वाखाली शपथपत्रे व तक्रार अर्ज घेऊन थेट जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा काढला.

यावेळी जिल्हाधिकारी तसेच जिल्हा महिला व बालकल्याण अधिकाऱ्यांना निवेदन सादर करून, एका महिन्याच्या आत सर्व तांत्रिक अडथळे दूर करून लाभ तात्काळ पूर्ववत व सुरळीत सुरू करण्याची मागणी करण्यात आली.

लाभ थांबल्यामुळे महिलांना आर्थिक अडचणींचा सामना करावा लागत असून, घरगुती खर्च, औषधोपचार व मुलांच्या शिक्षणावर त्याचा परिणाम होत असल्याचे महिलांनी यावेळी सांगितले. केवायसी पूर्ण असूनही लाभ रोखण्यात येणे अन्यायकारक असल्याची भावना व्यक्त करण्यात आली. जर एका महिन्याच्या आत लाभ पूर्ववत करण्यात आला नाही, तर जिल्हास्तरावर तीव्र स्वरूपाचे आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा संतप्त महिलांसह ओबीसी महासंघाच्या वतीने देण्यात आला आहे. यावेळी मोठ्या संख्येने महिला जिल्हाधिकारी कार्यालय परिसरात उपस्थित होत्या.

## वृत्तविशेष...

### विरोधी पक्षातील खासदारांनी सुचवलेल्या कामासाठी निधी न मिळाल्याने काँग्रेस खासदार प्रशांत पडोळे यांनी व्यक्त केली नाराजी



**दैनिक आपला विदर्भ**

**गोंदिया/प्रतिनिधी :** आज गोंदिया जिल्ह्याच्या नियोजन समितीची बैठक जिल्हाधिकारी कार्यालयाच्या नियोजन सभागृहामध्ये पार पडली. यावेळी भंडारा गोंदिया लोकसभेचे खासदार प्रशांत पडोळे यांनी सुचवलेल्या कामावर निधी मिळत नाही यावर प्रशासनावर नाराजी व्यक्त केली. आमच्या कामांना निधी मिळणार का नाही असा जाब पालक मंत्र्यांना विचारला यावेळी समाधानकारक उत्तर न मिळाल्याने प्रशांत पडोळे हे नियोजन समितीच्या बैठकीच्या मंचावरून सभागृहात खाली गेले व जमिनीवर बसले.. त्यानंतर पालकमंत्र्यांनी त्यांना निधी देऊ असा शब्द दिल्यानंतर प्रशांत पडोळे हे पुन्हा बैठकीच्या मंचावर जाऊन बसले. प्रशांत पडोळे यांनी केलेल्या कृतीमुळे नियोजन समितीच्या सभागृहात काही काळापर्यंत गोंधळ उडालेला होता.

### पाण्यासाठी हंबरडा : खारपानपट्ट्यातील गावांचा संयम संपला,पिण्याच्या पाण्यासाठी खारपानपट्ट्यातील सरपंचउपसरपंच संघटना आक्रमक





**बुलढाणा/प्रतिनिधी** :३८ गाव पाणीपुरवठा योजनेच्या रखडलेल्या कामाविरोधात तहसील कार्यालयासमोर धरणे आंदोलन बुलढाणा जिल्ह्यातील शेगाव तालुक्यातील खारपानपट्ट्यातील ३८ गाव पाणीपुरवठा योजनेचे काम ठरलेला कालावधी संपून अनेक वर्षे उलटूनही अद्याप पूर्ण झालेले नाही. परिणामी या भागातील गावांमध्ये पिण्याच्या पाण्याची तीव्र टंचाई निर्माण झाली असून ग्रामस्थांना दररोज मोठ्या हालअपेष्टा सहन कराव्या लागत आहेत. या पार्श्वभूमीवर प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी आज सोमवारी सरपंच व उपसरपंच संघटनेच्या वतीने शेगाव तहसील कार्यालयासमोर एकदिवसीय धरणे आंदोलन करण्यात आले. या आंदोलनात खारपानपट्ट्यातील विविध गावांचे सरपंच, उपसरपंच तसेच ग्रामस्थ मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. खारपानपट्ट्यातील अनेक गावांमध्ये पाण्यातील क्षारांचे प्रमाण अधिक असल्याने नागरिकांमध्ये केस गळतीसह विविध आरोग्य समस्या वाढत आहेत. वर्षभराहून अधिक कालावधी उलटूनही या गावांना शुद्ध पिण्याचे पाणी मिळत नसल्याने नागरिकांमध्ये तीव्र संताप व असंतोष व्यक्त होत आहे. लोकप्रतिनिधींविरोधातही नाराजीचा सूर उमटू लागला आहे. तात्काळ पिण्याच्या पाण्याची पर्यायी व कायमस्वरूपी व्यवस्था करावी, तसेच ३८ गाव पाणीपुरवठा योजनेची कामे तातडीने पूर्ण करावीत, अशी ठाम मागणी आंदोलनकर्त्यांनी केली. मागण्या मान्य न झाल्यास येणाऱ्या जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकांवर बहिष्कार घालण्याचा इशाराही यावेळी गावकऱ्यांच्या वतीने देण्यात आला.

### यवतमाळ येथे लाडकी बहीण योजनेसाठी महिलांचा आक्रोश; केवायसी पूर्ण करा किंवा लाभ बंद करा

**यवतमाळ/प्रतिनिधी :** मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेत हप्ता न मिळालेल्या महिलांनी यवतमाळ येथील महिला व बालकल्याण विभागात धडक देत आक्रमक अवस्थेत निदर्शने केली. उपस्थित अधिकाऱ्यांसह कर्मचाऱ्यांवर संताप व्यक्त करताना त्यांनी केवायसी प्रक्रिया तात्काळ पूर्ण करून लाभ मिळवून देण्याची मागणी केली.अन्यथा सर्व महिलांचा लाभ बंद करण्याची धमकीही दिली. या प्रकारानंतर महिला व बालकल्याण विभागाने ई-केवायसीची लिंक पुन्हा सुरू करण्यासाठी थेट शासनाकडे पत्र पाठवले आहे. आता शासन या मागणीचा विचार करणार की नाही, ही येणारी वेळच सांगेल.

# अरुणोदय सिकलसेल ॲनिमिया विशेष अभियानांतर्गत ब्रम्हपुरी(वाडी) येथे जनजागृती

**दैनिक आपला विदर्भ**

**बुलढाणा/प्रतिनिधी** : जिल्ह्यात अरुणोदय विशेष सिकलसेल तपासणी मोहीम दि. १५ जानेवारी ते ७ फ ेब्रुवारी २०२६ या कालावधीत राबवली जात आहे. मोहिमेंतर्गत ब्रम्हपुरी (वाडी) येथील प्राथमिक शाळेत विद्यार्थ्यांना सिकलसेल आजाराची लक्षणे, प्रतिबंध व उपचाराबाबत मार्गदर्शन करून जनजागृती करण्यात आले.

प्राथमिक आरोग्य केंद्र, किन्होळा (ता. बुलढाणा) अंतर्गत अरुणोदय सिकलसेल ॲनिमिया विशेष अभियान प्रभावीपणे राबविण्यात येत आहे. जिल्हा विस्तार व माध्यम अधिकारी राजेश धुताडमल तसेच जिल्हा स्तरीय पर्यवेक्षक सुजीत हिवाळे, विजय जाधव यांनी अभियानातील विविध उपक्रमांची पाहणी केली. ही पाहणी जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. अमोल गिते यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली.

यावेळी उपकेंद्र केळवद येथे भेट देऊन मोहिमेच्या प्रगतीचा आढावा घेण्यात आला. तसेच ब्रम्हपुरी (वाडी) येथील प्राथमिक शाळेत विद्यार्थ्यांना सिकलसेल आजाराची लक्षणे, प्रतिबंध व उपचाराबाबत मार्गदर्शन करून जनजागृती करण्यात आली. गावामध्ये सुरू असलेल्या सिकलसेल गृहभेटी व सर्वेक्षणादरम्यान संबंधित कुटुंबांना भेट देऊन माहिती देण्यात आली व विचारपूस करण्यात आली.या कार्यक्रमास मुख्याध्यापक दीपक पाटील, आरोग्य सेवक कुलदीप सावळे, आरोग्य सेविका वैशाली मगर, आशा स्वयंसेविका अर्चना अंबोरे, मदतनीस वेदिका मोरे व अंगणवाडी सेविका लिला जाधव उपस्थित होते. अरुणोदय अभियानांतर्गत सिकलसेल तपासणी, जनजागृती व समुपदेशन या उपक्रमांमुळे नागरिकांकडून सकारात्मक प्रतिसाद मिळत असून, आरोग्य विभागामार्फत अभियानाची प्रभावी अंमलबजावणी सुरू असल्याचे यावेळी स्पष्ट करण्यात आले.

# विद्यार्थ्यांसाठी मानव विकास मिशन बस सुरू करण्याची मागणी

## अंजनी बु. येथील शाळकरी मुलींचे आमदार सिद्धार्थ खरात यांना निवेदन



**दैनिक आपला विदर्भ**

**मेहकर/प्रतिनिधी :** अंजनी बु. परिसरातील अनेक विद्यार्थी शिक्षणासाठी दररोज मेहकर येथे ये-जा करतात. या विद्यार्थ्यांमध्ये कामगार, शेतकरी व शेतमजूर कुटुंबातील मुलांचा मोठा सहभाग आहे. घरच्या आर्थिक परिस्थितीमुळे मेहकर येथे खोली भाड्याने घेणे शक्य नसल्याने हे विद्यार्थी दररोज बसनेच प्रवास करतात. सध्या अंजनी बु. येथून सकाळी ९.३० वाजता मेहकरकडे एकच बस असून ती सर्वसामान्य प्रवाशांसाठी आहे. या बसमध्ये क्षमतेपेक्षा अधिक प्रवासी व विद्यार्थी असल्याने विद्यार्थ्यांना बसमध्ये चढणे व सुरक्षित प्रवास करणे कठीण होत आहे.



अनेक वेळा गर्दीमुळे विद्यार्थ्यांचे एक ते दोन तासांचे वर्ग चुकत असून त्यांच्या शिक्षणावर परिणाम होत आहे. तसेच सायंकाळी मेहकर येथून ४ वाजता सुटणाऱ्या बसचीही अशीच परिस्थिती असून विद्यार्थ्यांना मोठ्या गैरसोयीचा सामना करावा लागत आहे.

या पार्श्वभूमीवर विद्यार्थ्यांसाठी स्वतंत्र मानव विकास मिशन बस सेवा सुरू करण्यात यावी, अशी मागणी अंजनी बु. येथील शाळकरी मुलींनी मेहकरलोणार मतदारसंघाचे आमदार सिद्धार्थ खरात यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे. अंजनी बु. ते मेहकर सकाळी १०.३० वाजता आणि मेहकर ते अंजनी बु. सायंकाळी ५ वाजता केवळ विद्यार्थ्यांसाठी मानव विकास मिशनची बस सुरू करण्यात यावी, अशी ठाम मागणी निवेदनात करण्यात आली आहे.

सध्या परीक्षा सुरू असल्याने विद्यार्थ्यांना वेळेवर परीक्षा केंद्रावर पोहोचणे अत्यंत आवश्यक आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांची होणारी गैरसोय लक्षात घेता येत्या दोन दिवसांत मानव विकास मिशन बस सेवा सुरू करण्यात यावी, अशी विनंतीही निवेदनात करण्यात आली आहे.

या निवेदनावर पूजा संजय पायघन, शितल संतोष ढोले, अनुराधा ज्ञानेश्वर नागोलकर, पूजा गजानन लाड, आरती ज्ञानेश्वर वानखेडे, साक्षी नागेश लाड, पूनम शिवाजी पायघन, पूजा विष्णू ढोले, कल्याणी मारोती सावसुंदर, पूजा गणेश लाड, कृष्णाली अशोक पिंपळे, आरती किसन खुरद, श्रावणी रामेश्वर ढोले, गायत्री महादेव पायघन, सभा फिरोज पठाण, अनुराधा सतीश आवटे यांच्यासह परिसरातील अनेक शाळकरी विद्यार्थी व पालकांच्या सह्या आहेत.

# शेगावात विषय समितीवर ८ पैकी ७ सदस्य भाजपा सेना युतीचे नगर परिषदेवर भाजपा सेना युतीचे वर्चस्व

**दैनिक आपला विदर्भ**



**बुलढाणा/प्रतिनिधी :** बुलढाणा जिल्ह्यातील संतनगरी शेगाव नगरपालिकेतील विषय समित्यांची निवडणूक आज मंगळवारी पार पडली यामध्ये एकूण १० पदांपैकी आठ जागांवर भारतीय जनता पार्टी शिवसेना युतीने आपला कब्जा जमवला आहे.

शेगाव नगर परिषदेत विशेष सभेचे आयोजन करण्यात आले होते या सभेत विविध विषय समित्यांचे गठन व सभापती पदाची निवड केली गेली आहे. सभागृहात भारतीय जनता पक्षाचे बहुमत असल्याने सर्व विषय समित्या भाजपाच्या ताब्यात आहेत. तर स्थायी समितीमध्ये विरोधी पक्ष असलेल्या भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्षाचे नगरसेवक शिवाजी बुरुंगले हे सदस्य म्हणून आले आहेत. नगर परिषदेत भाजपाचे १५, शिवसेना २, काँग्रेस ६, एमआयएम ४, वंचित बहुजन आघाडी २ व शिवसेना उबाठा पक्षाचा १ असे पक्षीय बलाबल आहे. विषय समित्यांमध्ये बांधकाम, शिक्षण, पाणीपुरवठा, आरोग्य, महिला व बालकल्याण तथा नियोजन समिती अशा ६ समित्यांचा समावेश असतो. तर स्थायी समितीमध्ये एकूण दहा सदस्य आहेत. व या समितीचा अध्यक्ष हा नगराध्यक्ष स्वतः असतो. त्यामध्ये नगराध्यक्षासह सहा विषय समित्यांचे सभापती व तीन इतर सदस्य घेतले जातात. अशाप्रकारे आज नगरपरिषदेच्या स्थायी व विषय समित्यांचे सदस्य व सभापतींची निवड केली गेली. निवड घोषित झाल्यानंतर दुपारी शहरातून विजय सभापतींची मिरवणूक काढण्यात आली यावेळी भारतीय जनता पार्टीचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

बांधकाम सभापती -अंकुश देशमुख
पाणीपुरवठा सभापती -पवन महाराज शर्मा
शिक्षण सभापती - सोनू उर्फ रमेश मोहोड
आरोग्य सभापती - आकाश नावकार
महिला व बालकल्याण समिती सभापती- सौ सुचिता काळे
स्थायी समिती सदस्य- सौ अलका खानजोडे, शिवाजी बुरुंगले

# जयस्तंभ चौकातील स्वातंत्र्यस्मारक अतिक्रमणाचा मुद्दा ऐरणीवर आझाद हिंद संघटनेचे बुलढाणा नगरपालिकेत लोटांगण आंदोलन

**दैनिक आपला विदर्भ**

**बुलढाणा/प्रतिनिधी :** बुलढाणा शहरातील जयस्तंभ चौकात स्वातंत्र्यलढ्यातील हुतात्म्यांच्या स्मृती जिवंत ठेवण्यासाठी १५ ऑगस्ट १९४७ रोजी भारतीय स्वातंत्र्य स्मारक म्हणून अक्षय वटवृक्षाची स्थापना करण्यात आली होती. मात्र या ऐतिहासिक स्मारक परिसरात अतिक्रमण झाल्याचा आरोप होत असून, ते अतिक्रमण तात्काळ हटवून स्मारक परिसर मोकळा करण्यात यावा, अशी मागणी आझाद हिंद संघटनेच्या वतीने करण्यात आली आहे.





या मागणीसाठी आझाद हिंद संघटनेचे संस्थापक अध्यक्ष सतीशचंद्र रोठे यांच्या नेतृत्वाखाली बुलढाणा नगरपालिकेत लोटांगण आंदोलन करण्यात आले. मात्र यावेळी मुख्याधिकारी उपस्थित नसल्याने आंदोलनकर्त्यांनी नाराजी व्यक्त केली. मुख्याधिकाऱ्यांच्या बंद दालनाला हार अर्पण करून निवेदन देत निषेध नोंदविण्यात आला.

स्वातंत्र्य चळवळीतील हुतात्म्यांच्या स्मृतीशी संबंधित असलेल्या या स्मारकाकडे प्रशासनाने गांभीर्याने लक्ष देणे आवश्यक असून, ऐतिहासिक वारशाचे जतन करणे ही प्रशासनाची जबाबदारी असल्याचे आंदोलनकर्त्यांनी यावेळी सांगितले.

जयस्तंभ चौकातील स्वातंत्र्य स्मारक अतिक्रमणमुक्त करून त्याचे जतन व सौंदर्यीकरण करण्यात यावे, अशी मागणी करण्यात आली. येत्या ४८ तासांत मागणी मान्य न झाल्यास आझाद हिंद संघटनेच्या वतीने शहरातील विविध ठिकाणी रास्तारोको आंदोलन करण्यात येईल, असा इशारा यावेळी देण्यात आला आहे.